# शहीद चौगुले कुटुंबीयांचे कुलगुरुंकडून सांत्वन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

उंबरवाडी (ता. गडहिंग्लज) येथील शहीद जवान जोतिबा चौगुले यांच्या कुटुंबीयांचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी भेट घेऊन सांत्वन केले. या कुटुंबीयाला सावरण्यासाठी विद्यापीठाच्या शहीद स्फूर्ती केंद्राच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असा दिलासा डॉ. शिंदे यांनी दिला.

डॉ. शिंदे यांनी विद्यापीठाच्या शहीद स्फूर्ती केंद्राचे समन्वयक डॉ. आर. व्ही. शेजवळ यांच्यासह बुधवारी सायंकाळी उंबरवाडी येथे जाऊन शहीद चौगुले यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांनी वीरपिता गणपती चौगुले, माता वत्सला, वीरपत्नी यशोदा, भाऊ रजत यांच्यासह चौगुले कुटुंबीयांचे सांत्वन केले. तीन वर्षांपूर्वी मेजर संतोष महाडिक शहीद झाले, त्यावेळी शिवाजी विद्यापीठातर्फे सातारा येथे शहीद स्फूर्ती केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्रामार्फत शहीद जवानांच्या कुटुंबीयांना सावरण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे सहाय्य करण्यात येते. याच धर्तीवर चौगुले कुटुंबीयांनाही केंद्रामार्फत दिलासा व सहकार्य करण्यात येईल, असे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

# शहीद चौगुले यांच्या कुटुंबीयांचे कुलगुरू डॉ. शिंदेंकडून सांत्वन

कोल्हापूर : उंबरवाडी (ता. गडहिंग्लज) येथील हुतात्मा जवान जोतिबा चौगुले यांच्या कुटुंबीयांची शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी भेट घेऊन सांत्वन केले. या कुटुंबियाला सावरण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या शहीद स्फूर्ती केंद्राच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असा दिलासा कुलगुरू डॉ. शिंदे यांनी यावेळी दिला.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विद्यापीठाच्या शहीद स्फूर्ती केंद्राचे समन्वयक डॉ. आर. व्ही. शेजवळ यांच्यासह बुधवारी सायंकाळी उंबरवाडी येथे जाऊन शहीद चौगुले यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. तीन वर्षांपूर्वी मेजर संतोष महाडिक शहीद झाले, त्यावेळी शिवाजी विद्यापीठातर्फे सातारा येथे शहीद स्फूर्ती केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्रामार्फत शहीद जवानांच्या कुटुंबियांना सावरण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे सहाय्य करण्यात येते. याच धर्तीवर चौगुले कुटुंबियांनाही केंद्रामार्फत सहकार्य करण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.



डॉ. मेघा पानसरे यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठातर्फे प्रशस्तिपत्र प्रदान करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर

# पानसरेंमुळे विद्यापीठाचा लौकिक वाढला

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांना 'सिर्गेइ इसेनिन' आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याने शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वाढला, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले. डॉ. मेघा पानसरे यांना तिरूवनंतपुरम येथील रशियन सांस्कृतिक केंद्र व मॉस्कोस्थित सासकीय इसेनिन म्युझियम यांच्या संयुक्त विद्यमाने 'सिर्गेइ इसेनिन पुरस्कार-२०१९' हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार तिरुवनंतपुरम येथे रशियन दुतावासातर्फे आयोजित 'रशियन भाषा व साहित्य महोत्सवा'त प्रदान करण्यात आला. यानिमित्त कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विशेष प्रशस्तीपत्र प्रदान करून डॉ. पानसरे यांचा गौरव

केला. डॉ. पानसरे यांनी आंतरराष्ट्रीय भाषांदरम्यान हा संवादाचा पूल निर्माण करण्यात मोलाची कामगिरी बजावल्याची ही पोचपावती असून यापुढील काळातही त्यांनी आपले कार्य असेच अखंडितपणे सुरू ठेवावे. त्यांच्या या कामगिरीचा विद्यापीठाला अभिमान असल्याचे



कोल्हापूर : विहीर खोदाईचा प्रारंभ पोकलेन चालवून करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

# कुलगुरू शिंदे यांनी चालवले पोकलेन

## अनोखे उद्‌घाटन; विहीर खोदाईचा प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

कसबा बावडा, ता. २० : बांधकामाचे उद्‌घाटन म्हटले की खोदाई आली आणि त्याची सुरुवात करताना टिकाव मारून केली जाते; पण आज शिवाजी विद्यापीठात नवीन विहीर खोदाईचा प्रारंभ कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी चक्क पोकलेन चालवून केला. कुलगुरूंनी सफाईदारपणे पोकलेन चालवून उपस्थितांना सुखद धक्का दिला.

पाण्याबाबत स्वयंपूर्ण झालेले शिवाजी विद्यापीठ देशातील एकमेव आहे. पावसाचे पाणी वाहून जाऊ नये आणि साठलेले पाणी वाया जाऊ नये म्हणून विद्यापीठात नेहमी नवीन योजना आखण्यात येत आहेत. त्यातीलच एक भाग म्हणून मेघनाथ नागेशकर क्रीडासंकुलातील मैदानी स्पर्धेच्या ट्रॅकच्या बाजूला विहीर खोदाईचा प्रारंभ केला. नवीन बंधाऱ्याच्या बाजूस काढलेली विहीर, त्याच्यापलीकडे क्रिकेटचे क्रीडांगण, त्यापलीकडे ट्रॅक आणि त्याच्या पलीकडे विहीर खोदल्याने पाणी नैसर्गिकपणे या विहिरीत येईल, हा त्याचा उद्देश. त्यासाठी कुलगुरू देवानंद शिंदे आले होते. खोरे आणि फावड्याऐवजी पोकलेनने खोदाई करणार असल्याचे कळताच ते थेट पोकलेनजवळ गेले आणि चालकाकडून जुजबी माहिती घेऊन सफाईदारपणे पोकलेन चालवून सुखद धक्का दिला. या अनोख्या उद्‌घाटनाची चर्चा विद्यापीठ परिसरात आज दिवसभर होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 DEC 2019

तरुण भारत

# विद्यापीठातर्फे शिव-पावन प्रेरणा मोहीम आज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि चिखली येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'पन्हाळा ते पावनखिंड : शिव - पावन प्रेरणा' मोहिमेचे आयोजन केले आहे. शिबिराची सुरुवात शनिवार २१ डिसेंबर रोजी सकाळी ७:३० वाजता पन्हाळा येथून होणार असून, रविवार २२ रोजी सायंकाळी ६ वाजता पावनखिंड येथे सांगता होईल. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन केले आहे.

शिबीरामध्ये कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, प्रा. पोपट माळी यांच्यासह विद्यापीठातील उपकुलसचिव तसेच इतर २० अधिकारी, कर्मचारी, १५० विद्यार्थी, विद्यार्थीनी सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 DEC 2019
तरुण भारत

# विद्यापीठाकडून कबीरपंथीय भजनांचे संकलन सुरु

## मराठी विभागातील डॉ. नंदकुमार मोरे यांची माहिती



**प्रतिनिधी**
कोल्हापूर

आष्टा व दूधगाव सारख्या गावांमध्ये उत्तर भारतातील संत कबीरांची भजन परंपरा जोपासली जात आहे, ही गोष्ट अभिमानास्पद आहे. संत कबीरांच्या भजनात मानवी जीवनाचा सखोल अर्थ दडला आहे. अशिक्षित लोकांकडून दुर्मिळ व दुर्लक्षित लोककला प्रकाराच्या संकलन व संवर्धनाच्या आधारे महाराष्ट्राचे एक समृद्ध सांस्कृतिक चित्र जगासमोर उभे करता येईल, असे मत डॉ. नंदकुमार मोरे यांनी व्यक्त केले. दूधगाव येथे कबीरपंथीय भजनाच्या छायाचित्रणानिमित्त ते उपस्थित होते.

डॉ. मोरे म्हणाले, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून लोककला संकलन व संशोधन प्रकल्पाचे काम सुरू असून शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राचे प्रकल्प प्रमुख म्हणून डॉ. मोरे काम पहात आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील दुर्लक्षीत, दुर्मिळ लोककलाप्रकारांचे संकलन व संवर्धन केले जात असून लावणी, तमाशा, जागर, गोंधळ, सोंगीभजन, डहाक, कीर्तन, पिंगळा, वासुदेव, पोतराज, नमन खेळे, करबल, गजनृत्य आदी लोककलाप्रकारांचे संकलन सुरू आहे. पश्चिम महाराष्ट्रात केवळ दूधगाव व आष्टा या दोनच गावात संत कबीरांच्या हिंदी भजनांची परंपरा जोपासली जात असल्याची माहिती अविनाश कुदळे व भरमू भाऊ गाजी यांनी दिली. दूधगाव येथील रावसाहेब आडमुठे, कृष्णा आंबी, पांडुरंग घोडके, शिवाजी गवळी, मारुती गवळी, धोंडीराम सपकाळ आदींनी भजनाचे गायन केले.

लोकमत

# ज्यूदो स्पर्धेसाठी विद्यापीठ संघ रवाना

लोकमत न्यूज नेटवर्क



कानपूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ज्यूदो स्पर्धेसाठी निवड झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या संघासोबत डॉ. धनंजय पाटील, लीना पाटील, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते.

**कोल्हापूर :** कानपूर येथे रविवार (दि. २२) ते मंगळवार (दि. २४) दरम्यान होणाऱ्या आंतरविद्यापीठ ज्यूदो स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ शुक्रवारी रवाना झाला.

स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या संघात ४८ किलोसाठी श्रद्धा गिरी (न्यू कॉलेज), ५२-किलो. - सोनाली मगदूम (महावीर महाविद्यालय), ५७ किलो - गौरी पाटील ङ.कळ., ७८ किलो, मानसी पाटील (विवेकानंद कॉलेज), ७० किलो-ऋतुजा पाटील (इस्लामपूर), ६३ किलो-प्रेरणा गायकवाड, (आदर्श कॉलेज, विटा), ७८ किलोवरील खुला गट-प्रतीक्षा पोवार छ.इ.र. कॉलेज. सातारा) यांचा समावेश आहे. या संघाला डॉ. धनंजय पाटील (प्रशिक्षक), प्रा. लीना पाटील (व्यवस्थापक) म्हणून रवाना झाले आहेत. या सर्वांना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, विद्यापीठ क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.

# विद्यापीठात राष्ट्रीय विद्यार्थी संमेलन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंट ऑफ इंडियाच्या कोल्हापूर शाखा व वेस्टर्न इंडिया स्टुडंट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ व २२ डिसेंबर रोजी राष्ट्रीय विद्यार्थी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन शिवाजी विद्यापीठातील भाषा भवन येथे होणार आहे. या संमेलनास सीए इन्स्टिट्यूटच्या बोर्ड ऑफ स्टडीजचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सीए दुर्गेश काबरा, खा. धैर्यशील माने, प्रख्यात उद्योजक संजय घोडावत आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे.